# महावितरण
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र शासन (उपक्रम)

CIN : U40109MH200SSGC153645

दुरध्वनी क्र. : २६४७४२११/२६४७२१३१
वि.क्र. ३६२४
Website : www.mahadiscom.in
E-mail : dccell@mahadiscom.in

शिस्तभंग कारवाई कक्ष
"प्रकाशगड", ४ था मजला,
अनंत काणेकर मार्ग,
स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.


क्र. मासं/शिनि-४/२०२०/४९८३

दिनांक:- 05 FEB 2020

## शुध्दीपत्रक
## (प्रशासकीय परिपत्रक क्र. ५१० दि. १६/०६/२०१५)

**विषय:** मालमत्ता विवरण पत्र सादर करणेबाबत.

मालमत्ता विवरण पत्रे सादर करणेबाबत शासन निर्णय क्र. वाशिअ-१२१४/प्र.क्र.५१(२)/११ दि.१७/११/२०१४ च्या अनुषंगाने, प्रशासकीय परिपत्रक क्र. ५१० दि.१६/०६/२०१५ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. प्रशासकीय परिपत्रक क्र. १ दि. २९/०९/२००५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (संचलन), संचालक (वित्त), संचालक (प्रकल्प), संचालक (वाणिज्य) व संचालक (मासं), यांचेशी विचारविनियम करुन सदर परिपत्रकातील अनु क्र. ३ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मंजूरी दिली आहे. त्यानुसार प्रशासकीय परिपत्रक क्र. ५१० दि.१६/०६/२०१५ मधील अनु. क्र.३ खालील प्रमाणे वाचण्यात यावा. तसेच परिच्छेद ५(अ) नव्याने समाविष्ट करण्यात येत आहे.

३) या आदेशानुसार कंपनीत कार्यरत अधिकारी /कर्मचारी त्यांचे मालमत्ता विवरण पत्र सोबत जोडलेला प्रपत्र क्र. १ते ३ मध्ये भरुन वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनेनुसार विहित कालावधीत सादर न केल्यास ती गैरवर्तणूक मानण्यात येईल व अशा गैरवर्तणूकीबदद्ल सदर अधिकारी /कर्मचारी यांचेवर सक्षम अधिकाऱ्यांच्या स्तरावरुन शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल."

५(अ) आपल्या कार्यक्षेत्राअंतर्गत कार्यरत असणाऱ्या वर्ग १ ते ३ मधील अधिकाऱ्यांनी मालमत्ता विवरणपत्र सादर केले नसल्यास विवरण पत्र सादर करणेसाठी संबंधितांना सूचीत करणे व विहित कालमर्यादेनंतरही विवरण पत्रे न सादर करणाऱ्यांवर उचित शिस्तभंग कारवाई करणे /शिस्तभंग कारवाई करण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्याकडे तसा प्रस्ताव सादर करण्याची जबाबदारी ही संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांची राहील.

सदरचे शुध्दीपत्रक तात्काळ लागू करण्यात येत आहे. पूर्वी निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणांना हे परिपत्रक लागू राहणार नाही.

सदरचे शुध्दीपत्रक कंपनीच्या employee-portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

(शिवाजी इंदलकर)
कंमाडर (सेवानिवृत्त)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं) (प्रभारी)

D:\Asolkar CIO New\Property Return\Office Note Paripatrak-510.docx